महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं-२०२०-२१/केंद्र पुरस्कृत अल्प./ शिष्यवृत्ती / 4808 दिनांक- २२.०७.२०२१.

26 JUL 2021

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय : केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी NSP पोर्टलवरुन महाविद्यालयांची नोंदणी व KYC करणेबाबत सन २०२१-२२ करीता.**

**संदर्भ : भारत सरकार इलेक्ट्रॉनिकी आणि सूचना प्रौद्योगिकी मंत्रालय नवी दिल्ली यांचे पत्र क्र. D.O.No/HOD/NSP/२०२१- ५२ दि.५.७.२०२१ चे पत्र.**

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय पत्र कृपया अवलोकन करावे. सोबत प्रत जोडली आहे.

संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने केंद्रशासनाच्या एन.एस.पी. पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत १.केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना २.महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना ३.अपंग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना या तीन योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येते. सदरहू योजनेची सविस्तर माहिती संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

NSP पोर्टल द्वारे सर्व महाविद्यालयांना Aadhar base लॉगीन करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे तसेच सन २०२१-२२ पूर्वी ज्या महाविद्यालयांनी KYC पूर्ण केले आहेत त्यांनी त्यांच्या NSP Portal वर Institute लॉगीन मध्ये आधार व मोबाईल नंबर नोंदणी( Register) करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२१-२२ साठी नवीन महाविद्यालय /संस्था यांची KYC करण्याबाबतची प्रक्रीया NSP Portal च्या HOME Page वरील Services Option वर Institute KYC Registration Form मध्ये देण्यात आलेली आहे.(सोबत प्रक्रिया करण्याबाबतची प्रत जोडत आहे.) सदर Form भरल्यानंतर State Nodal Officer द्वारे सदरच्या भरलेल्या तपशीलाची पडताळणी करून त्यांना ऑनलाईन पध्दतीने युजर आयडी व पासवर्ड मिळेल.

NSP Portal द्वारे ज्या शिष्यवृत्ती लाभार्थीचे आधार कार्ड, मोबाईल नंबर प्रमाणित केलेले आहेत व त्यांचे वय १८ वर्षांच्या वर आहे अशा सर्व ( Fresh & Renewal) लाभार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळेल.

तरी सदर विषयाचे गांभिर्य विचारात घेऊन आपल्या विभागातील महाविद्यालयांची वरील सुचनेप्रमाणे कार्यवाही करून घेण्यात यावी.

(डॉ. प्रकाश बच्छाव )
शिक्षण सहसंचालक ,प्रशासन
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे -१

Scanned by CamScanner

**प्रत- माहिती व कार्यवाहीस्तव,**

**आपल्या अधिनस्त असलेल्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना याबावत कार्यवाही करण्यावावतच्या सूचना देण्यासाठी आवश्यक त्या कार्यवाहीस्तव**

१. मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, ०३ महापालिका मार्ग ,मुंबई
२. मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई
३. मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ०३ महापालिका मार्ग, मुंबई.
४. मा.संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,भांबुर्डा, पुणे.
५. मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१
६. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, वणी . दिंडोरी रोड नाशिक-४२२ ००४.
७. कुलसचिव, महाराष्ट्र पशुविज्ञान विद्यापीठ.फुटाला लेक, नागपूर ४४० ००१
८ .मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-०१-.
- यांनी त्यांच्या अधिनस्त असणा-या कनिष्ट महाविद्यालयांना (इयत्ता ११ वी व १२ वी ) सूचना देण्यात याव्यात.

९. कुलसचिव, सर्व कृषि /अकृषि /अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

Scanned by CamScanner